पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत --

मी पोना 6532 कुमार, नेमणूक हवेली पो.स्टे.

सध्या मी हवेली पो.स्टे. येथे डी.बी./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुणे पोलीस आयुक्त श्री. डॉ. के. वेंकटेशम सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी/व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलीस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणिव होवू लागली आहे. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलीसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करणे बद्दल [illegible] प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचेच पुस्तक आहे असे मला वाटते.

(सही)

पोना 6532 कुमार [illegible]
हवेली पो.स्टे. पुणे

## गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटस्अ‍ॅप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

(सही)

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# वाहतुक सुलभता

वाहतुक सुलभता

# फोर्डतर्फे चालकांसाठी डिस्कव्हर बँड

## रस्त्यावर सुरक्षित वाहतूक होण्यासाठी उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुरक्षेततेप्रती जागृकता निर्माण करण्यासाठी फोर्ड इंडियाने डिस्कव्हर बँड सादर केला आहे. अंगठ्यासाठी असलेला हा लवचिक बँड जबाबदारीने ड्रायव्हिंग करण्याची सवय अंगिकारण्यासाठी व रस्त्यांना सुरक्षित करण्यासाठी प्रोत्साहित करतो.

फोर्ड इंडियाच्या विपणन विभागाचे उपाध्यक्ष राहुल गौतम यांनी सांगितले की, आपल्या अंगठ्यावर असलेला डिस्कव्हर बँड, आपल्याला रोजच्या वागणुकीमध्ये माणुसकी राखण्याची आठवण करुन देईल. हा बँड अंगठ्यात घातल्यावर तुम्हाला अनावश्यकपणे हॉर्न न वाजविणे, चुकीच्या बाजूने गाडी न चालविणे, संकटात असलेल्या लोकांना मदत करणे व लहान मुले मागील आसनावर बसले असल्याची खात्री घेणे अशा गोष्टी करण्यास प्रोत्साहित करेल. भावी वाहनचालकांमध्ये चांगल्या सवयी अंगिकारल्या जाव्यात यासाठी फोर्ड निकलोडियनच्या सहयोगाने भारतभरातील ६५० शाळांमधील ५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत त्यांना सुरक्षिततेचा संदेश दिला जात आहे. कंपनी या विद्यार्थ्यांना डिस्कव्हर बँडचे वाटप होईल. हे विद्यार्थी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना रस्त्यावर वागण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवतील. यावेळी आरजे इराही उपस्थित होत्या.



फोर्डतर्फे आयोजित उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी नीलेश मोरे व इतर मान्यवर.

> पुणेकरांना २० सेकंदांचा सिग्नल पाळण्यासाठी वेळ नाही. पण वाहतूक पोलिसांनी सिग्नल तोडल्यावर पकडल्यावर त्यांच्याशी वाद घालण्यासाठी ते तासभरही थांबण्याइतका त्यांच्याकडे वेळ असतो. वाहतूक नियम हे लोकांच्या सुरक्षिततेसाठी केलेले आहेत. ते पाळणे ही सर्वांची आवश्यकता आहे.
>
> **- नीलेश मोरे, वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक**

लोकमत – दि. १९ सप्टेंबर, २०१९

# १०३२ वाहनचालकांवर कारवाई

पुणे : वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या ३ हजार ३०० वाहनचालकांना वाहतूक प्रशासनाने समन्स बजावले होते. यापैकी मोटार वाहन न्यायालयातील महालोक अदालतीद्वारे १०३२ वाहनचालकांवर वाहतूक प्रशासनाने कारवाई केली. त्यांच्याकडून ३ लाख २७ हजारांचा दंड वसूल केला.

शहरात वाहतूक शाखेकडून वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहण्याकरिता नियमांचा अवलंब केला जात आहे. बेशिस्त वाहनचालकांवर सीसीटीव्हीद्वारे कारवाई करण्यात येते. तसेच ड्रंक ड्राईव्हशी संबंधित केसेस या मोटार वाहन न्यायालयात दाखल केल्या जातात.

वाहतूक शाखेचे उपआयुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेतील खटला विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे, सहायक पोलीस निरीक्षक जाधव व कर्मचारी यांनी मोटार वाहन न्यायालय येथे आयोजित केलेल्या महा लोकअदालतीकरिता ३ हजार ३०० वाहनचालकांना समन्स बजावली. यापैकी १०३२ वाहनचालकांकडून ३ लाख २७ हजारांचा दंड वसूल केला.

प्रभात – दि. २४ सप्टेंबर, २०१९

# 'पोलीस दादा' थँक्स!

## वाहतूक नियम पाळणाऱ्यांना 'आभार'द्वारे प्रोत्साहन

प्रभात वृत्तसेवा

**सकारात्मकतेचे दर्शन**

पुणे, दि. २३ - वाहतूक पोलीस घोळक्याने चौकांमध्ये उभे असतात.. विनाकारण वाहतूक पोलीस 'टार्गेट' करतात.. वाहतूक पोलीस 'अव्वाच्या सव्वा' दंड वसूल करतात.. दंड वसूल करताना अरेरावी केली जाते.. वाहतूक कोंडीकडे मात्र पोलिसांचे लक्ष नाही.. ही आणि अशी अनेक वाक्ये रोज वाहतूक पोलिसांच्या विरोधात ऐकायला मिळतात. मात्र, वाहतूक पोलिसांबाबत 'ही योजना उत्तम आहे, थँक्स' असेही वाक्य ऐकायला मिळते. याचे कारण आहे, वाहतूक विभागाची 'आभार' योजना. जून ते सप्टेंबर या कालावधीत सुमारे ३० हजारपेक्षा अधिक 'आभार' कूपन वाहनचालकांना दिले असल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली.

वाहतूक पोलिसांनी वाहन थांबवले आणि वाहनावर कोणताही थकीत दंड नसेल, नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकाला वाहतूक पोलिसांकडून 'आभार' कूपन देण्यात येते. जून महिन्यापासून राबवण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत हजारो वाहनचालकांना कूपन दिले. या कूपनला अधिकाधिक सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे वाहतूक पोलिसांकडून सांगण्यात आले. इतकेच नव्हे तर आवर्जुन कूपन मिळाल्यानंतर वाहनचालक 'आभार' मानत असल्याची भावना वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांनी दै. 'प्रभात'शी बोलताना व्यक्त केली.




कूपनद्वारे वाहनचालकाला मिळालेल्या क्रमांकानुसार वाहनचालकाला हॉटेल्ससह विविध दुकाने आणि 'स्विगी', 'झोमॅटो' या सारख्या 'फूड डिलेव्हरी साईट'वर देखील सवलत मिळते.

'आभार' कूपन्स मिळालेल्या वाहनचालकांपैकी बहुतांश जणांनी कूपन्सचा सर्वाधिक उपयोग 'प्रसिद्ध' खाद्यपदार्थांसाठी केला आहे. सुमारे १५० अधिक व्यावसायिकांनी स्वेच्छेने या योजनेमध्ये सहभाग घेतला असल्याचे वाहतूक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

> वाहतूक पोलीस केवळ दंड आकारतात, अशी कल्पना अनेकांच्या मनात आहे. मात्र, या योजनेद्वारे पोलीस नियम पाळणाऱ्यांना 'प्रोत्साहन' देखील देतात. स्वतःच्या सुरक्षिततेसाठी नियम पाळणे गरजेचे आहे. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी नियमांचे पालन केले पाहिजे. वाहतुकीला शिस्त लागावी, असा यामागील हेतू आहे. 'आभार' योजनेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.
>
> – पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतू

महाराष्ट्र टाइम्स – दि. ११ सप्टेंबर, २०१९

# मिरवणुकीसाठी वाहतुकीत बदल


## मिरवणूक मार्ग व परिसरातील १७ रस्ते वाहतुकीसाठी बंद

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी शहराच्या मध्यवस्तीच्या वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. मुख्य विसर्जन मिरवणूक मार्ग व परिसरातील १७ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी रिंग रोड तयार करण्यात आला आहे. त्या मार्गाचा नागरिकांनी वापर करावा. विसर्जन मिरवणूक सुरू झाल्यापासून ते मिरवणूक संपेपर्यंत हे रस्ते बंद राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गाचा आवलंब करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे उपायुक्त पंकज देशमुख यांनी केले आहे.

### पार्किंगची ठिकाणे

एचव्ही देसाई कॉलेज, शनिवार पेठ, पुलाची वाडी नदी किनारी, पुरम चौक ते हॉटेल विश्व दरम्यान रस्त्याच्या डाव्या बाजूने, दारूवाला पुल तेरवडीचे मैदान, गाडगीळ पुतळा ते कुंभारवेस, काँग्रेस भवनजवळील मनपा रस्ता, जयंतराव टिळक पूल ते भिडे पुल दरम्यान नदी पात्रातील रस्ता, हमालवाडा पार्किंग नारायण पेठ.




(नकाशा प्रमाणानुसार नाही)

### वेबसाइटवर रस्त्यांची माहिती

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वेळी कोणते रस्ते बंद राहणार आहेत. कोणत्या रस्त्याने वाहतूक सुरू आहे. कोणत्या ठिकाणाहून वाहतूक वळविण्यात आली आहे. या सर्व गोष्टींची माहिती नागरिकांना ऑनलाइन पहाता येणार आहे. त्यासाठी पुणे पोलिसांनी https://www.punetrafwatch.com ही वेबसाइट सुरू केली आहे. पालखीच्या वेळेस प्रायोगिक तत्त्वावर ही वेबसाइट सुरू केली होती. आता त्याचा उपयोग गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वेळी करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांनी दिली.

### वाहतुकीसाठी बंद असलेले रस्ते

- **शिवाजी रस्ता :** काकासाहेब गाडगीळ पुतळा जंक्शन ते जेधे चौक.
- **लक्ष्मी रस्ता :** संत कबीर चौकी ते टिळक चौक.
- **बाजीराव रस्ता :** बजाज पुतळा चौक ते फुटका बुरूज चौक.
- **कुमठेकर रस्ता :** टिळक चौक ते चितळे कॉर्नर चौक.
- **गणेश रस्ता :** दारूवाला पुल ते जिजामाता चौक.
- **केळकर रस्ता :** बुधवार चौक ते टिळक चौक.
- **गुरु नानक रस्ता :** देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक, गोविंद हलवाई चौक.
- **टिळक रस्ता :** जेधे चौक ते टिळक चौक.
- **शास्त्री रस्ता :** सेनादत्त पोलिस चौकी ते टिळक चौक.
- **जंगली महाराज रस्ता :** झाशी राणी चौक ते खंडोजीबाबा चौक.
- **कर्वे रस्ता :** नळस्टॉप चौक ते खंडोजीबाबा चौक.
- **फर्ग्युसन रस्ता :** खंडोजी बाबा चौक ते फर्ग्युसन कॉलेज मुख्य प्रवेशद्वार.
- **भांडारकर रस्ता :** पी. वाय. सी जिमखाना ते गुडलक चौक, नटराज चौक.
- **पुणे सातारा रस्ता :** व्होल्गा चौक ते जेधे चौक.
- **सोलापूर रस्ता :** सेव्हन लव्हज चौक ते जेधे चौक.
- **प्रभात रस्ता :** डेक्कन पोलिस ठाणे ते शेलारमामा चौक.

### ढोल पथकांच्या वाहनांना बंदी


ढोल-ताशा पथकांकडून त्यांची वाहने मुख्य विसर्जन मिरवणूक मार्ग असलेल्या पेठांमध्ये आणली जातात. पण, या वर्षी पथकांना त्यांची वाहने आतमध्ये आणू नयेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.



### विसर्जनासाठी पाण्याचे नियोजन

पुणे : गणेश विसर्जनाच्या काळात मुठा नदी आणि मुठा उजवा कालव्यामध्ये पुरेसे पाणी असेल, याबाबतचे नियोजन करण्यात आले आहे. सध्या चारही धरणे पूर्ण क्षमतेने भरली असल्याने खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडण्यात येत असून, विसर्जनाच्या काळात पाण्याचा विसर्ग सुरू ठेवण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

धरण परिसरात पावसाची संततधार असल्याने खडकवासला धरणातून सतत पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे यंदाच्या गणेश विसर्जनासाठी पाण्याची कमतरता भासणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या वर्षी परतीचा पाऊस झाला नाही. त्यामुळे विसर्जनासाठी पुरेशा प्रमाणात पाणी सोडण्यात आले नव्हते. मात्र, यंदा पावसाने दिलासा दिला आहे. उपनगरी भागांमध्ये कालव्यात श्री गणेशाचे विसर्जन करण्यात येते. त्यामुळे विसर्जनाच्या दिवशी कालव्यातही पाणी सोडले जाणार आहे. सध्या खडकवासला धरणातून मुठा उजवा कालव्यामध्ये १०५४ क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.



> सध्या चारही धरणे भरली आहेत. खडकवासला धरणातून मुठा नदीत पाण्याचा विसर्ग सुरू आहे. गणेश विसर्जनाच्या कालामध्ये नदीमध्ये मुबलक प्रमाणात पाणी असणार आहे.
>
> – पांडुरंग शेलार, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग

महाराष्ट्र टाइम्स – दि. २५ सप्टेंबर, २०१९




एनईएमएस पूर्वप्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी वाहतूक समस्येवर जनजागृती अभियान राबविले.

# 'एनईएमएस'मध्ये वाहतुकीबाबत जनजागृती

पुणे : डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या एन. ई. एम. एस. पूर्वप्राथमिक शाळेत वाहतूक समस्येवर नुकतेच जनजागृती अभियान राबविण्यात आले. पुण्यातील वाढती वाहतूक समस्या लक्षात घेता पालक व शाळेचे व्हॅनचालक यांच्यामध्ये जागृती व्हावी यासाठी शिक्षकांनी विविध फलक तयार केले होते. सिग्नल पाळा, हेल्मेटचा वापर करा, सिटबेल्ट वापरा तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी जवळच्या ठिकाणी सायकलचा वापर करा, इलेक्ट्रिक वाहने वापरा आणि सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांचा वापर करा, असे संदेश लहानग्यांनी दिले.

शाला समितीच्या अध्यक्षा डॉ. सविता केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पा कुलकर्णी आणि सर्व विद्यार्थी, शिक्षिकांनी अभियानात सहभाग घेतला होता. अभियानासाठी विश्रामबाग पोलिस चौकीच्या वाहतूक शाखेतील पोलिस उपनिरीक्षक रोहिदास किरवे व पोलिस हवालदार शांताराम सांगडे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पालकांना आणि व्हॅनचालकांना वाहतूक नियमांचे संदेश लिहिलेले शुभेच्छापत्र भेट देण्यात आले.

**प्रभात** – दि. २५ सप्टेंबर, २०१९

# १ लाख ३८ हजार फोटोंद्वारे 'ट्रॅफ वॉच' होतोय वाटाड्या

### 'फोटो टॅगिंग' असणारा देशातील पहिलाच प्रकल्प

### दिवसभरात हजारो नागरिक करतात संकेतस्थळाचा उपयोग

### 'ई-चलन'सह कारवाईचा तपशीलही 'अपलोड'

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४** - नागरिकांना शहरांतर्गत प्रवास करणे सोपे जावे, या हेतूने 'ट्रॅफ वॉच' या संकेतस्थळाची निर्मिती शहर वाहतूक विभाग, चेंजभाई, स्मार्ट सिटी आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स यांच्या संकल्पनेतून करण्यात आली आहे. याद्वारे नागरिकांना सुमारे १ लाख ३८ हजार फोटोंद्वारे रस्त्यांची दैनंदिन परिस्थिती एका क्लिकवर मिळत आहे. 'फोटो टॅगिंग' असणारा देशातील हा पहिला प्रकल्प आहे.

मागील काही महिन्यांत उद्भवलेल्या पूरजन्य स्थितीमध्ये सुमारे ३० लाखांहून अधिक वेळा 'ट्रॅफवॉच'चा उपयोग झाला. तर पालखीसाठी तयार करण्यात आलेल्या 'पेज'ला साडेचार लाखांहून अधिक 'हिट्स' मिळाले. यासह संकेतस्थळाचा उपयोग दिवसभरांत हजारो नागरिक करत आहेत.

नागरिकांना ज्या परिसरामध्ये जायचे आहे, त्यांनी इंटरनेटवर 'पुणे ट्रॅफवॉच' असे नाव टाकून संकेतस्थळ सुरू करावे. त्यानंतर अपेक्षित चौकाचे नाव 'टाइप' केल्यानंतर त्या परिसरातील 'लाईव्ह ट्रॅफिक' पाहता येणार आहे. यासह 'सिग्नल', 'झेब्रा क्रॉसिंग', सम-विषम पार्किंग, 'साइनबोर्ड', 'ब्लॅक स्पॉट', 'नो-एन्ट्री', 'नो-पार्किंग' आदींसह संबंधित परिसरांत वाहतूक विभागाने केलेल्या कारवाईचा तपशिल पाहता येणार आहेत. यांसह वारंवार त्रास सहन कराव्या लागणाऱ्या गोष्टी यामध्ये समाविष्ट केल्या आहेत, वाहतूक नियमांचे उल्लंघन होणारे चौक, पाणी साचणारी ठिकाणे, बेकायदा लावलेले बॅनर आदी बाबींचा यामध्ये समावेश आहे.



### नागरिकांनो, सहभाग नोंदवा

दै. 'प्रभात'च्या 'वाहतूक' विषयाच्या 'विशेष मालिके'मध्ये पुणेकरांना सहभाग नोंदवता येणार आहे. पुण्यातील वाहतूक परिस्थितीबाबत संस्थांनी त्यांचा तयार केलेला विशेष अहवालदेखील पाठवता येणार आहे. **reporterprabhat30@gmail.com** या ई-मेलवर पुणेकरांनी सहभाग नोंदवून आपल्या प्रतिक्रिया पाठवाव्यात.




"नागरिकांना 'मार्गदर्शिका' प्रमाणे 'ट्रॅफवॉच'चा उपयोग होतो. हे संकेतस्थळ सर्वांनाच उपयुक्त आहे. या संकेतस्थळावर 'ई-चलना'सह कारवाईचा तपशिलदेखील 'अपलोड' करण्यात येत आहे. 'पुणे ट्रॅफवॉच'वर 'रिअल टाइम अपडेट' असल्याने नागरिकांसाठी ही संकल्पना फायदेशीर ठरणार आहे.

– **पंकज देशमुख,** पोलीस उपायुक्त, वाहतूक

# धनकवडीत वाहतूक शाखेकडून जामरची कारवाई

## एक लाख तीस हजार रुपयांचा दंड वसूल

**धनकवडी : वार्ताहर**

भारती विद्यापीठामागील बाजू ते त्रिमूर्ती चौक, कात्रज चौक परिसर, धनकवडी फाटा, बालाजीनगर, गुलाबनगर या परिसरातील रस्त्यावर नो पार्किंग व डबल पार्किंग करून वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर भारती विद्यापीठ वाहतूक शाखेच्या वतीने जामरची कारवाई करण्यात आली.

या वेळी दुचाकी व चारचाकी वाहनांवर १ सप्टेंबर ते २२ सप्टेंबरअखेर कारवाई करून एक लाख ३० हजार चारशे रुपये दंड वसूल करण्यात आला. नो पार्किंग ठिकाणी वाहने पार्किंग केल्यास वाहतुकीस अडथळा होऊन नागरिकांना त्रास होत आहे. ही कारवाई भारती विद्यापीठ वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय धुमाळ, सहायक पोलिस फौजदार शहाजी ओंबासे, पोलिस हवालदार नरेंद्र पालखी, सुधीर गायकवाड या पथकाने केली. ही कारवाई यापुढेही चालू राहणार असल्याचे धुमाळ यांनी सांगितले.



चारचाकीवर केलेली कारवाई.

## नो पार्किंगमधील वाहने उचलली

**धायरी : वार्ताहर**

सिंहगड रोड परिसरातील नऱ्हे येथील नवले पूल चौकात नो पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर सिंहगड रोड वाहतूक शाखेच्या वतीने धडक कारवाई करण्यात आली.

या परिसरात दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांवर कारवाई करण्यात आली. ही वाहने वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा ठरत असल्यामुळे कारवाई करण्यात येत असल्याचे वाहतूक शाखेच्या पोलिसांनी सांगितले.

सिंहगड रोड वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक एम. के. आदलिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार आत्माराम अहिरे, संदीप सोनवणे, विशाल साठे, पप्पू परदेशी या पथकाने ही कारवाई केली.



नो पार्किंगमध्ये लावण्यात आलेल्या वाहनांवर कारवाई करताना पथक.

पुण्यनगरी – दि. १० सप्टेंबर, २०१९

# शाळेच्या प्रांगणातच घडतो उद्याचा भारत

## सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र देशमुख : नूमवि प्रशालेतील शिक्षकांचा गौरव



**पुणे : प्रतिनिधी**

मुलांची जडण-घडण करताना आई-बाबांचे आणि शिक्षकांचे योगदान खूपच महत्त्वाचे असते. शाळेच्या आवारात सर्व शैक्षणिक संस्कार आणि पालकांच्या सानिध्यात मुले उत्तम सवयींचे संस्कार शिकत असतात. खऱ्या अर्थाने शाळेच्या प्रांगणातच घडत असतो उद्याचा भारत, असे गौरवोद्‌गार वाहतूक विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र देशमुख यांनी काढले.

राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी नूमवि प्रशालेच्या मुख्याध्यापिका संजीवनी ओमासे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तर, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष अनंता केंडे हे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील शिक्षकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रशालेच्या पर्यवेक्षक प्राची गुमास्ते, आनंदा घोलप, भरत सुरसे, देवराम चपटे, तसेच, पालक शिक्षक संघाचे सचिव लालबहादूर जगताप यांच्यासह सुजन कदम, तनुजा साबळे, उज्ज्वला माळी, मनोज उरणकर, जयश्री पंडे, सुनीता जोशी, मंगल पवार, सारीका उभे, मुजावर आशीयाना, दत्ता आव्हाळे, वनिता पारखे, माधुरी भागवत, रूपाली मरळ, पंकज मोरे यांच्यासह पालक संघाचे सदस्य उपस्थित होते.

# पुस्तिकेतून वाहतूक जनजागृती

**पुणे, ता. १५ :** जागतिक चालक दिनानिमित्त सारथी प्रतिष्ठानतर्फे रस्ता सुरक्षा जनजागृती करण्यात आली. डेक्कन येथील खंडोजीबाबा चौक येथे पोलिस निरीक्षक किरण बालवडकर यांच्या हस्ते वाहतुकीचे नियम पाळण्याबाबतच्या पुस्तिकेचे वाटप करत वाहतूक नियमांची माहिती दिली.

केंद्र सरकारचा नवीन वाहतूक कायदा, वाढीव दंड शुल्क व त्याबाबतची राज्याची भूमिका, रस्ते अपघात आदी विषयांवर या वेळी बालवडकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष मानमोडे, कार्याध्यक्ष अनिल जाधव, सचिव राजेंद्र वाघचौरे, अंकुश ओंबळे, संतोष जगताप, एकनाथ पासलकर आणि प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. नवीन वाहन परवाना देताना नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे प्रत्येक वाहन परवानाधारकाने नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. या नियमांबाबत वाहनचालकांचे प्रबोधन करणे गरजेचे असल्याचे बालवडकर यांनी सांगितले. तसेच, या कार्यक्रमात संजीवन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील थिगळे, शासकीय कर्मचारी संघटनेचे मारुती शिंदे, रोड सेफ्टी ट्रेनरचे बालाजी माने, डेक्कन जिमखाना लायन्स क्लबचे अध्यक्ष अभिजित मारणे यांनी मार्गदर्शन केले.



**खंडुजीबाबा चौक : जागतिक चालक दिनानिमित्त सारथी प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमात सिग्नलवरील दुचाकीचालक महिलेला नियमांची पुस्तिका देताना किरण बालवडकर व सारथी प्रतिष्ठानचे पदाधिकारी.**

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अमंलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसाविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट : - के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय : - दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षांपासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्ह्याचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्या या संदर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबत मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर


चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत

At junctions of Smart City, an 'intelligent' syste
to help manage Pune's many traffic problems

आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'

avy police cover, traffic curbs
pares to bid farewell to Ganpa

गुन्हे शाखेने ८० लाखांचे हस्तिदंत पकडले

नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण

तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे

स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच

th checks ... ss programmes during

व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न

क्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध

चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त

तत्काळ मदतीला धावून पोलिसांनी वाचवले प्राण

द्धिवादाची जोपासना करा

नदीत उडी मारलेल्या तरुणाला वाचवले

जच्या नावाखाली चालणा
या व्यवसायाचा पर्दाफाश

तंबाखूजन्य पदार्थ
ाणणाऱ्यांवर कारवाई

गदान प्रेरणादायक : बापट

दागिनेचोर जेरबंद

ILLEGAL SAND TRANSPORTATION

Driver arrested for stealing trucks attached by revenue dept officials

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, SEPTEMBER 11

डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक

नावट वस्तू बनवणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश

गुन्हेगार जेरबं

वाघाच्या कातड्याची तस्करी

e Branch busts inters

बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

atches' in Pune

eize 452 choppers
wo days, arrest six

परराज्यातील
टोळी गजाआ

महागडी घड्याळे लांबविणारी दिल्लीतील चोरट्यांची टोळी

पिस्तुलाची हौस पडली महागात!
दोघांना अटक, भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई

दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त